# स्वंनिधी सर्टिफिकेट कोर्स स्पोकेन इंग्लिश अहवाल २०१८-१९

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षात मा.प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या इतिहासात प्रथमच स्वंनिधी या योजनमार्फत विद्यार्थ्यांच्या भविष्यात उपयोगी पडणाऱ्या शॉर्ट टर्म या कालावधीसाठी महाविद्यालय स्थरावर त्यांना पदवी सोबतच सर्टिफिकेट कोर्स करता यावे या उद्देशाने विद्यार्थ्यांची १ सप्टेंबर २०१८ पासून प्रवेश प्रक्रिया राबवून दि. ०१/१०/२०१८ ते ३१/०३/२०१९ हा कालावधी निश्चित करण्यात आला. सदर स्वंनिधी सर्टिफिकेट कोर्सचे उदघाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य मा.प्राध्यापक नितीन बारी यांच्या हस्ते सर्टिफिकेट कोर्स जी.एस.टी. आणि स्पोकन इंग्लिश कोर्सची सुरुवात केली. सर्टिफिकेट कोर्स स्पोकन इंग्लिश. कोर्सला महाविद्यालयातील एकूण ४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. सर्टिफिकेट कोर्स स्पोकेन इंग्लिश हा विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रत्येकी ५०० रुपयांच्या मोबदल्यात योग्य ते ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी आठवड्यात किमान चार तासिका व्हाव्यात या उद्देशाने सर्टिफिकेट कोर्स स्पोकेन इंग्लिश.संदर्भात विद्यार्थ्यांना योग्य ज्ञान मिळावे म्हणून विविध तज्ञ मंडळीना आमंत्रित करून त्यांना अद्ययावत ज्ञान देण्यासाठी प्राध्यापक अजय पाटील, डॉ. मनोज निकाळजे, डॉ.रुपाली तायडे श्री. जीवन खराटे, , मा.प्राचार्य अरविंद चौधरी , डॉ.रत्ना जवरास यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

स्वंनिधी प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यासाठी संस्थेचे चेअरमन मा. श्री.मिठुलालजी अग्रवाल, उपाध्यक्ष मा. श्री. अजयजी जैन, सचिव मा. श्री. विकासजी कोटेचा, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य अरविंद चौधरी सर, उपप्राचार्य श्री. डी. एस. पाटील सर, यांचे नेहमीच सहकार्य मिळत असते म्हणून या सर्वांचे मी ऋण व्यक्त करते.

डॉ.रत्ना जवरास
स्वंनिधी समन्वयक





स्वंनिधी प्रमाणपत्र अभ्यासक्रम उदघाटन